# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः31.01.2025** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजपासून आरंभ, आर्थिक सर्वेक्षणही आज सादर होणार
- भारत लवकरच पूर्णपणे स्वदेशी आणि रास्त किंमतीत उपलब्ध होणारी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली सादर करणार.
- प्रयागराज इथल्या कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या चौकशीसाठीचा न्यायालयीन आयोग आज संगम घाटाला भेट देणार

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यातला 20 षटकांचा चौथा सामना आज पुण्यात, तर 19 वर्षांखालील महिलांच्या क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत क्वालालंपूर इथं भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान आज उपांत्य फेरीचा सामना

**संसद अधिवेशन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होईल. राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आर्थिक सर्वेक्षण आढावा सादर करतील. उद्या त्या 2025-26 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करतील. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारदर्शक ठरावावर सोमवारी दोन्ही सभागृहात चर्चा होईल.या अधिवेशनात 16 वित्त विधेयकांसह, वक्फ(सुधारणा), स्थलांतर आणि परदेशी नागरिक, बँकिंग कायदा (सुधारणा), रेल्वे सुधारणा ही विधेयकं चर्चेसाठी मांडली जाणार आहेत. आजपासून सुरू होत असलेल्या अधिवेशनाचं पहिलं सत्र पुढील महिन्याच्या 13 तारखेपर्यंत सुरू राहणार आहे. तर दुसरं सत्र 10 मार्च ते 4 एप्रिल कालावधीत पार पडणार आहे.

**सर्व पक्षीय बैठक**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्र्वभूमीवर काल नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. त्यामध्ये अधिवेशनाच्या काळात दोन्ही सभागृहांचं कामकाज

सुरळितपणे पार पाडण्यासाठी  सहकार्य करण्याचं आवाहन सरकारच्या वतीनं करण्यात आल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**वक्फ अहवाल**
वक्फ सुधारणा विधेयकासंदर्भात नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या शिफारशींचा अहवाल काल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना सादर करण्यात आला. समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी संसद भवनात बिर्ला यांची भेट घेऊन त्यांना हा अहवाल सुपूर्द केला.

**कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली**
भारत लवकरच स्वदेशी तंत्रज्ञानानं विकसित आणि रास्त किंमतीत उपलब्ध होणारी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली सादर करणार असल्याची माहिती केंद्र सरकारनं दिली आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री आश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना ही माहिती दिली. ही प्रणाली सहा महिन्यांच्या आत सादर होण्याची शक्यता असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. यासाठी शास्त्रज्ञ, संशोधक, तंत्रज्ञ आणि कोडिंग तज्ज्ञ काम करत असल्याचं त्यांनी नमूद केलं.
आंतरराष्ट्रीय कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली प्रति तासासाठी अडीच ते तीन डॉलर इतकं शुल्क आकारतात. मात्र केंद्र सरकार चाळीस टक्के अंशदान देणार असल्यामुळे भारतीय प्रणाली प्रति तास शंभर रुपयांपेक्षाही कमी शुल्कात उपलब्ध होईल असं वैष्णव म्हणाले. सहामाही आणि वार्षिक योजना घेतल्यास हे शुल्क आणखी रास्त असेल अशी माहिती त्यांनी दिली.भारतीय कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली ही भारताचा विश्वासार्ह देश म्हणून ठसा उमटण्यासाठीचं योग्य वेळेत उचललेलं पाऊल असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आणि ही प्रणाली भारतीय भाषांचा वापर करून भारतीय संदर्भात उपलब्ध होण्याचं काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे, असंही नमूद केलं. डीपसीक या प्रणालीबाबतच्या सुरक्षाविषयक चिंतांबाबत विचारलेल्या प्रश्नावर वैष्णव यांनी सांगितलं, की सुरक्षाविषयक प्रोटोकॉल्स तपासून ही प्रणाली लवकरच भारतीय सर्व्हर्सवर आणली जाईल.

**प्रयागराज**
प्रयागराज इथल्या कुंभमेळ्यात नुकत्याच झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेला न्यायालयीन आयोग आज संगम घाटाला भेट देणार आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश हर्ष कुमार या आयोगाचं नेतृत्व करत आहेत. उत्तरप्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंग आणि महासंचालक प्रशांत कुमार यांनी काल संगमस्थळाला भेट दिली. पुढील अमृतस्नानाच्या दिवशी प्रशासनानं सुरक्षा यंत्रणांचं नियोजन चोख करावं, गर्दीच्या ठिकाणी जास्तीत जास्त अधिकारी तैनात करावेत, सुरक्षा व्यवस्थांमध्ये कोणताही त्रुटी राहणार नाही याची खात्री करावी अशा सूचना त्यांनी केल्या. दरम्यान, कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेता मार्गिकेत बदल करण्यात आला आहे. मात्र वाहनांवर बंदी घालण्यात आल्याच्या वृताचं जिल्हाधिकारी रवींद्र कुमार यांनी खंडन केलं आहे. प्रयागराजमध्ये वाहनांच्या प्रवेशावर 4

फेब्रुवारीपर्यंत बंदी असेल. असा संदेश समाजमाध्यमावर फिरत असल्याच्या पार्शवभूमीवर त्यांनी हे स्पष्टीकरण दिलं आहे. 31 जानेवारी, 1 फेब्रुवारी आणि 4 फेब्रुवारी रोजी रस्ते मार्गात कोणताही बदल होणार नाही. वसंतपंचमीला अमृत स्नान असल्यानं प्रयागराजमध्ये केवळ 2 फेब्रुवारी आणि 3 फेब्रुवारी रोजी वाहन प्रवेश प्रतिबंधित असेल असं एका व्हिडीओ संदेशात त्यांनी स्पष्ट केले.

**इस्राईल ओलिस**

इस्राईल आणि हमास यांच्यातल्या शस्त्रसंधीचा भाग म्हणून आठ ओलिसांची काल हमासकडून मुक्तता करण्यात आली. ओलिसांमध्ये तीन इस्रायली नागरिक आणि थायलंडच्या पाच नागरिकांचा समावेश आहे. आत्तापर्यंत एकूण 15 ओलिसांची मुक्तता करण्यात आली आहे. दरम्यान, या कराराचा भाग म्हणून इस्राईलनं काल 110 पॅलेस्टिनी कैद्यांची मुक्तता केली.

**दिल्ली-विधानसभा**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. विविध पक्षांचे नेते आणि उमेदवार प्रचारफेऱ्या, रोडशो आणि मतदारांची प्रत्यक्ष भेट यावर भर देत आहे. गेल्या 10 वर्षांपासून आपच्या कार्यकाळांत दिल्लीमध्ये कोणतंही परिवर्तन झालेले नाही, अरविंद केजरीवालांनी सामान्यांचा विश्वासघात केला आहे. दिलेली आश्वासनं पूर्ण करणारा भाजपा हा एकमेव पक्ष आहे असं भाजपाचे वरिष्ठ नेते राजनाथसिंह यांनी विश्वासनगर प्रचारादरम्यान मतदारांशी संवाद साधताना काल सांगितलं. दरम्यान, काँग्रेस पक्ष भाजपसोबत काम करत असल्याचा आरोप आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी काल माध्यमांशी बोलताना केला. समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी आम आदमी पक्षाच्या समर्थनार्थ रोड शोमध्ये भाग घेतला. आपनं घेतलेले सर्व निर्णय दिल्लीतील गरीब आणि सामान्य जनतेला फायदेशीर ठरत आहेत. आपचे सुशासन भाजपच्या कुशासनाला पराभूत करेल. अशी टीका यादव यांनी केली.

**विश्वमराठी**

तिसरं विश्व मराठी संमेलन आजपासून पुण्यात फर्ग्यूसन महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सकाळी 11 वाजता संमेलनाचं उद्घाटन होईल. येत्या 2 फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या संमेलनात शोभायात्रा, चर्चा, परिसंवाद, मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम, लोककलांचं सादरीकरण अशा अनेक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुख्य मंच, आणि प्र. के. अत्रे सभागृहात हे कार्यक्रम होणार आहेत.

**मुख्यमंत्री**

नवी दिल्लीमध्ये होणाऱ्या 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ दिलं जाईल, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिल्लीत सांगितलं. 21 ते 23 फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या या साहित्य संमेलनासाठी महाराष्ट्र सदनातील कार्यालयाचं

उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत होणाऱ्या या संमेलनाला विशेष महत्व आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**महिला-क्रिकेट**
क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या वीस षटकांच्या 19 वर्षांखालील महिलांच्या क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान उपांत्य फेरीचा सामना आज दुपारी 12 सामना खेळला जाणार आहे. निकी प्रसादच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं आतापर्यंत झालेल्या सर्व सामन्यांमध्ये वर्चस्व कायम राखलं आहे.

**क्रिकेट**
भारत आणि इंग्लंड यांच्यातला 20 षटकांचा चौथा सामना आज पुण्यात होणार आहे. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर संध्याकाळी 7 वाजता सामना सुरू होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत 2-1 नं आघाडीवर आहे.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**
उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पदकतालिकेत आघाडीवर आहे. काल ही स्पर्धा सुरु झाली. महाराष्ट्राच्या खात्यात अनेक पदकं जमा झाली असून काल ट्रायथलॉन इव्हेंटमध्ये म्हणजेच वैयक्तिक ट्रायथलॉन, संमिश्र रिले आणि ड्युअथलॉनमध्ये महाराष्ट्राच्या संघानं सर्वोत्कृष्ट कामगिरी करत सहा पदकांची कमाई केली. वैयक्तिक ट्रायथलॉन मध्ये पुरुष गटात पार्थ मिरजे यानं कास्य तर महिला गटात डॉली पाटील आणि मानसी मोहिते या दोघींनी सुवर्ण आणि रौप्यपदक पटकावलं. या स्पर्धेत सायकलिंग क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या पूजा दानोळे हिनं सुवर्णपदक मिळवत कालचा दिवस गाजवला. भारोत्तोलन स्पर्धेत महिलांच्या 45 किलो वजनी गटात केरळच्या सुफना जस्मिननं सुवर्णपदक मिळवलं, तर महाराष्ट्राच्या दीपाली गुरसाळेनं रौप्यपदक मिळवलं.  भारोतोलनमध्ये महाराष्ट्राच्या मुकुंद आहेर, आकाश गौड, सारिका, संकेत सरगर आणि शुभम तोडकर यांनी वेगवेगळ्या गटांमध्ये पदकं मिळवून उत्तम कामगिरी केली.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**